## ९. १९४५ नंतरचे जग - ।

**प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा :**
(१) १९४९ मध्ये **माओ झेडाँग** यांच्या नेतृत्वाखाली चीन कम्युनिस्ट राष्ट्र झाले.
(२) शांततामय सहजीवनाची संकल्पना **क्रुश्चेव्ह** यांनी मांडली.

**ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा**
(१) युरोपीय सत्तांच्या वर्चस्वाचा काळ – (उत्तर : **१९वे आणि २०वे शतक (१९४५ पर्यंत )** )
(२) अमेरिका-सोव्हिएट रशियादरम्यान तणाव – (उत्तर : **शीतयुद्ध** )

**क) गटात न बसणारा शब्द ओळखा ()**
(१) हंगरी, रोमानिया, बल्गेरिया, **फ्रांस**.
(२) इटली, **पोलंड**, स्पेन, ग्रीस.

**प्र. २ दुसऱ्या महायुद्धानंतरचे युरोपचे विभाजन या नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा**
**(१) पूर्व युरोपातील सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.**
**उत्तर :** (१) बल्गेरिया (२) रोमानिया.
**(२) पश्चिम युरोपातील अमेरिकेच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.**
**उत्तर :** (१) फ्रांस (२) इटली.

**प्र.३ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा :**
**(१) बोल्शेविक क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची भांडवलशाही राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.**
**उत्तर :** हे विधान चूक आहे.
**कारण :** बोल्शेविक क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची साम्यवादी (Communist) राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.

**(२) बांडुंग परिषदेने आशिया खंडात शीतयुद्ध आणले.**
**उत्तर :** हे विधान चूक आहे.
**कारण :** बांडुंग परिषदेने आशिया व आफ्रिकेत प्रादेशिकतावाद पसरवण्याची कामगिरी केली.

**प्र. ४ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(१) प्रादेशिकतावाद ही संकल्पना स्पष्ट करा,**
**उत्तर :** (१) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील राष्ट्रे आपले राष्ट्रहित एकत्रपणे साध्य करण्यासाठी जो गट तयार करतात, त्यास प्रादेशिक संघटन (Regional Organisation) असे म्हणतात.
(२) प्रादेशिक पातळीवरील या सहकार्याला प्रादेशिकतावाद असे म्हणतात.
(३) याद्वारा हे संघटन स्वतःची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात.
(४) भौगोलिक क्षेत्रातील संघटनप्रमाणेच ऊर्जा, दळणवळण,आरोग्य इत्यादी विशिष्ट कार्यांसाठीही गट

स्थापन केले जातात.
(५) आपापसातील संवादातून प्रादेशिकतावादाची सुरुवात होते. अशा संवादातून युरोपियन युनियन, आसियन, सार्क यांसारख्या संघटना निर्माण झाल्या.
(६) आसियन ही आग्नेय आशियातील राष्ट्रांची, तर सार्क ही दक्षिण आशियातील राष्ट्रांची प्रादेशिक संघटना आहे.

**(२) संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेबाबत चर्चा करा.**
**उत्तर :** संयुक्त राष्ट्रांची भूमिका (कार्ये) पुढीलप्रमाणे विशद करता येतील
**(अ) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे :** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखणे या उद्देशाने प्रेरित होऊन सन १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली होती. त्याअंतर्गत आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखणे, राष्ट्राराष्ट्रातील संघर्षांना प्रतिबंध करणे, संघर्षग्रस्त क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्यात साहाय्य करणे, जगात शांततापूर्ण परिस्थिती निर्माण करणे व वृद्धिंगत करणे ही भूमिका अपेक्षित आहे.
**(ब) मानवी हक्कांचे रक्षण करणे :** १९४८ साली संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला. मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणे हे संयुक्त राष्ट्रांचे एक उद्दिष्ट आहे. त्याबाबत आमसभा आणि आर्थिक व सामाजिक परिषद यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.
**(क) मानवीय मदत पुरवणे :** नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या काळात मानवी मदत कार्यात संयुक्त राष्ट्राने समन्वय साधणे अशी आंतरराष्ट्रीय समुदायाची अपेक्षा असते. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्राने आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी स्वरूपांच्या आंतरराष्ट्रीय समस्यांच्या निराकरणासाठी प्रयत्न करणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे हे अपेक्षित आहे.
**(ड) शाश्वत विकास संवर्धनासाठी कार्य करणे** : विकासाच्या जागतिक स्तरावरील संकल्पनेत काळानुरूप बदल होतात. संयुक्त राष्ट्राने आर्थिक विकासाची संधी आणि समृद्धीचे जतन करणे, व्यापक सामाजिक कल्याण व पर्यावरणाचे संरक्षण करणे या शाश्वत विकासाशी निगडित बाबींच्या संवर्धनासाठी कार्य करणे अपेक्षित आहे.
**(ई) आंतरराष्ट्रीय कायद्याचे उन्नयन करणे :** आंतरराष्ट्रीय कायदयाचा विकास करणे आणि त्याचा आदर राखणे हे संयुक्तराष्ट्रांचे महत्त्वाचे कार्य आहे. सुरक्षा परिषद, आंतरराष्ट्रीय न्यायालय व आंतरराष्ट्रीय लवाद यांच्या माध्यमांतून हे कार्य चालते.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा :**
**(१) शीतयुद्धाचे पैलू विशद करा :**
**[मुद्दे : (अ) राजकीय (ब) विचारप्रणाली (क) आर्थिक (ड) सुरक्षा.]**
**उत्तर :** दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यात उद्भवलेल्या संघर्षाला शीतयुद्ध असे म्हणतात. त्याचे काही पैलू पुढीलप्रमाणे आहेत
**(अ) राजकीय :** शीतयुद्धाचा पहिला पैलू म्हणजे महासत्तांनी आपल्या ताफ्यात असलेल्या पूर्व आणि पश्चिम युरोपांतील प्रभाव टिकवण्यासाठी केलेले प्रयत्न होय. पूर्व जर्मनी, पोलंड, चेकोस्लोवाकिया, हंगेरी, रोमानिया, बल्गेरिया आणि अल्बानिया हे पूर्व युरोपातील देश सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली; तर नेदरलँड,

डेनमार्क, बेल्जियम, पश्चिम जर्मनी, फ्रांस, इटली, स्पेन, ग्रीस आणि युनायटेड किंग्डम हे अमेरिकेच्या प्रभावाखाली होते. अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यात संघर्ष होऊ नये म्हणून फिनलँडवर तटस्थता लादण्यात आली होती.

**(ब) विचारप्रणाली :** सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखालील युरोपीय राष्ट्रांनी साम्यवाद व्यवस्था, तर अमेरिकेच्या प्रभावाखालील राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था व लोकशाही स्वीकारली.

**(क) आर्थिक :** पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी अर्थव्यवस्था,तर पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था स्वीकारली.पूर्व युरोपात सरकारी उद्योगधंद्यांना, तर पश्चिम युरोपात खाजगी उदयोगधंदयांना महत्व देण्यात आले.

**(ड) सुरक्षा :** पश्चिम युरोपला सोव्हिएट रशिया व पूर्व युरोप पासून असलेल्या धोक्यापासून सुरक्षा प्राप्त व्हावी या उद्देशाने अमेरिकेच्या पुढाकाराने उत्तर अटलांटिक लष्करी गटाची - नाटो ची स्थापना करण्यात आली. त्याची प्रतिक्रिया म्हणजे सोव्हिएट रशियाच्या पुढाकाराने १९५५ साली वॉर्सा करार करण्यात आला.